# कापूस बियाणे दरात वाढ होत नसल्याने उत्पादनात घसरण

## या वर्षी केवळ ११ रुपयांची दरवाढ; उत्पादक कंपन्यांची केंद्र सरकारकडे दरवाढीची मागणी

**सुहास सरदेशमुख, लोकसत्ता**

**छत्रपती संभाजीनगर :** तापमानात होणारे मोठे बदल, अवेळी पाऊस, मजुरीचे वाढत जाणारे दर लक्षात घेता कापूस बियाणांच्या किंमतीमध्ये वाढ करावी, अशी मागणी बियाणे उत्पादक कंपन्यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. या वर्षी प्रतिपाकीट ११ रुपयांची दरवाढ देण्यात आली आहे. बियाणांचा दर वाढत नसल्याने बियाणे उत्पादन मोठ्या प्रमाणात घसरले आहे. या वर्षी वेळेवर पाऊस पडला तर बियाणे देता येतील की नाही, अशी चिंता कृषी विभागाला भेडसावत आहे. २०१७ मध्ये देशात ६३८ लाख पाकिटे उपलब्ध होती ती आता ४६८ लाखापर्यंत घसरली जाऊ शकतात. जर बियाणे उत्पादन वाढवायचे असेल तर दरांमध्ये वाढ करावी, अशी विनंती नॅशनल सीड असोसिएशनने केंद्र सरकारकडे केली आहे.

या वर्षी कापूस पाकिटाचा दर ६६४ रुपये एवढा आहे. या वर्षी दरात ११ रुपये वाढ करण्याची परवानगी मिळाली. कापूस बियाणांची किमान किंमत गेल्या आठ वर्षांत केवळ आठ टक्के वाढली. तुलनेने मजुरीचे दर वाढत गेले. जागतिक तापमान वाढीमुळे मोठे बदल झाले आहेत. कापूस उत्पादन क्षेत्रात तामिळनाडू आणि गुजरात राज्यात बियाणे उत्पादक शेतकऱ्यांना द्यावे लागणारी मजुरी यामुळे बियाणे उत्पादक कंपन्यांना आता कापूस बियाणे घेणे परवडत नाही, असे महाराष्ट्र बियाणे उत्पादक असोसिएशनचे अध्यक्ष समीर मुळे म्हणाले. राष्ट्रीय स्तरावर हा प्रश्न बियाणे क्षेत्रातील असोसिएशन केंद्र सरकारसमोर मांडत आहेत. पण दर वाढलेले नाहीत. त्यामुळे आता कापूस उत्पादन घेणे परवडत नाही. परिणामी या वर्षी देशाच्या पातळीवर ४५८ लाख पाकिटे उपलब्ध आहेत.

मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरमध्ये ४७ बियाणे उत्पादक कंपन्या आहेत. तर जालना जिल्ह्यातही तेवढ्याच कंपन्या आहेत. बीटी कापसाची मागणी वाढत आहे. पण कापूस उत्पादन घटत आहे. उत्पादनातील घट आणि वाढते दर यामुळे बियाणांचे दर वाढविण्यासाठी गेले वर्षभर प्रयत्न सुरू आहेत. पण त्यात फारसे बदल होऊ शकले नाहीत.



**कापूस बियाण्यांची गेल्या आठ वर्षांतील उपलब्धता अशी घसरत गेली**

- २०१७ - १८ ६६८ लाख पाकिटे
- २०१८ - १९ ६८३
- २०१९ - २० ६६४
- २०२० - २१ ६४४
- २०२१ - २२ ५८७
- २०२२ - २३ ६६७
- २०२३ - २४ ५३८
- २०२४ - २५ ४५८

**मजुरीचे वाढलेले दर**

२०१६ मध्ये मजुराचे दर २३७ रुपये होती. ती २०२३ मध्ये ५२३ रुपयांपर्यंत वाढली आहे. गेल्या वर्षी बियाणांचे दर वाढलेले नव्हते. युरियाच्या किंमतीमध्ये २०१६ पासून २३.०९ वाढ झाल्याचे बियाणे असोसिएशनचे मत आहे.

> देशात कापूस उत्पादनात वाढ व्हावी, म्हणून संशोधन क्षेत्रात गुंतवणूक वाढवावी लागत आहे. विक्रेत्यांचे कमीशन वाढत आहेत. महागाईचा परिणाम अधिक आहे. त्यामुळे कापूस बियाणे उत्पादन घेणे परवडत नाही.
>
> समीर मुळे, अजित सीड्स, छत्रपती संभाजीनगर

# वीज अटकाव यंत्र वाढविण्याची मागणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** गेल्या तीन वर्षांत वीज पडून १४९ जणांचा मृत्यू झाला होता. वादळी वाऱ्यासह व विजेच्या कडकडाटासह पाऊस येत असल्याने वीज अटकाव करणारे यंत्र वाढविण्याच्या सूचना करण्यात येत आहेत. मराठवाड्यात बीड जिल्ह्यात सर्वाधिक ३०८ वीज अटकाव केंद्रे असून, त्यानंतर ७९ अटकाव केंद्रे बीड जिल्ह्यात आहेत. अन्य जिल्ह्यांमध्ये केवळ तीन वा चार यंत्रे आहेत. या जिल्ह्यात वीज अटकाव केंद्रांमध्ये वाढ करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकत्याच घेतलेल्या आढावा बैठकीत दिल्या आहेत.

मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात ३२ जणांचा मृत्यू झाला आहे. जिल्ह्यात वीज अटकाव केंद्राची संख्या केवळ चार आहे. त्यामुळे यंत्रे वाढवावीत, अशी मागणी करण्यात आहे.

बीड जिल्ह्यात सर्वाधिक ३०८ यंत्रे असून, ती सर्व सुरू आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही ७९ अटकाव केंद्रे सुरू आहेत. वीज पडून जनावरांच्या मृत्यूची संख्या अधिक आहे. वीज अटकाव यंत्र खरेदी करून ती यंत्रणा तत्काळ उभी करण्याची आवश्यकता आहे. ही सामग्री वाढवावी या मागणीला मुख्यमंत्र्यांनीही प्रतिसाद दिला असल्याचे सांगण्यात येत आहे. मराठवाड्यात सध्या ३९२ वीज अटकाव केंद्रे सुरू आहेत.

# दुष्काळ गंभीर, कृषिमंत्री परदेशात

## सरकार गंभीर नसल्याचा वडेट्टीवार यांचा आरोप

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यातील दुष्काळाची स्थिती गंभीर आहे. पिण्याच्या पाण्याचे संकट मोठे आहे. शेतकरी तर उद्ध्वस्त झाले. १ हजार ५६१ गावे आणि १ हजार ८६९ गावांमधून टँकरने पाणी दिले जात आहे. विभागीय बैठकांनाही कृषिमंत्री गैरहजर आहेत. या सरकारला दुष्काळाचा प्रश्न गांभीर्याने हाताळायचा नाही, कृषिमंत्री परदेशी गेल्याची माहिती आहे. मराठवाड्यात सर्वाधिक आत्महत्या कृषिमंत्र्याच्या जिल्ह्यात झाल्या आहेत. कर्ज मिळत नसल्याने शेतकरी आत्महत्या करत आहेत, असे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

मराठवाड्यात २६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. मुळात अनेक भागांत पिण्याचे पाणी मिळत नाही. जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पाण्याची तीव्र टंचाई आहे, असे असताना कृषीचा विभागनिहाय आढावा घेऊन नियोजन करण्याची गरज होती. नुकतेच छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील पिंपळकुटा येथील शेतकरी विठ्ठल दाभाडे यांनी कर्ज मिळत नसल्याने आत्महत्या केली. कर्ज मंजूर करण्यासाठी लाच मागितली जात आहे. खरेतर शेतकऱ्यांना दुष्काळाची मदत झाली ना अवकाळी पावसाची. अशा स्थितीमध्ये राज्य सरकारने अधिक लक्ष देण्याची गरज होती. पण सरकार काहीच करत नसल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

जालना जिल्ह्यात एका कुटुंबास राजकीय कारणावरून मारहाण करण्यात आल्याने त्यांचीही त्यांनी भेट घेतली.

मराठवाड्यातील दुष्काळ पाहणीसाठी काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले हेही संभाजीनगर येथे येणार आहेत. मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात विविध नेत्यांचे दौरे ठरविण्यात आले आहेत.

# ‘वनामकृवि’कडून तुरीचा पहिला संकरित वाण विकसित

**लोकसत्ता वार्ताहर**

**परभणी :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या बदनापूर येथील कृषी संशोधन केंद्राद्वारे विकसित करण्यात आलेल्या ‘बीडीएनपीएच १८-५’ या संकरित तूर पिकाच्या वाणास अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प खरीप कडधान्य, कानपूरद्वारा इक्रीसॅट, हैद्राबाद येथे घेण्यात आलेल्या वार्षिक समूह बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठाद्वारे शिफारस करण्यात आलेला हा पहिलाच तुरीचा संकरित वाण आहे.

विद्यापीठाच्या बदनापूर येथील कृषी संशोधन केंद्राने यापूर्वी तुरीच्या वाणाच्या विकासामध्ये राष्ट्रीय पातळीवर अनेक विक्रम केलेले आहेत आणि बीडीएनपीएच १८-५ या संकरित वाणामुळे शेतकऱ्यांची भरीव आर्थिक उन्नती साधता येईल. शेतकऱ्यांसाठी हा संकरित वाण लवकरच उपलब्ध करण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी नमूद केले. या वाणाची उत्पादकता १७५९ ते २१५९ किलोग्रॅम प्रति हेक्टरी इतकी असून हा वाण १५५ ते १७० दिवसात तयार होतो. दाण्याचा रंग पांढरा असून मर आणि वांझ या तुरीच्या प्रमुख रोगांकरिता हा वाण मध्यम प्रतीकारक असून किडींना कमी बळी पडतो.

# अवकाळीमुळे दोन महिन्यांत नऊ नागरिक, ७५ जनावरांवर अवकृपा

**लोकसत्ता वार्ताहर**

**लातूर :** गेल्या दोन महिन्यात अवकाळी पावसामुळे अंगावर वीज पडून नऊ नागरिक व ७५ लहान मोठ्या जनावरांना आपला जीव गमवावा लागला आहे. एप्रिल महिन्यात औसा, अहमदपूर आणि चाकूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. यामध्ये औसा, निलंगा तालुक्यात एकाचा तर चाकूर तालुक्यात दोघांचा मृत्यू ओढवला.

मे महिन्यात लातूर, औसा आणि निलंगा प्रत्येकी एक तर चाकूरमध्ये दोघांना जीव गमवावा लागला. या मृत शेतकरी कुटुंबांना प्रशासनाने तातडीची आर्थिक मदत दिली आहे. अवकाळीचा मोठा फटका शेतशिवारात बांधलेल्या मोठ्या जनावरांना बसला.

दोन महिन्यांत वीज पडल्याने तब्बल ७५ जनावरे दगावली आहेत. यामध्ये दुधाळ जनावरे ५३, दुधाळ लहान नऊ तर १३ बैलांची संख्या आहे. अवकाळी पावसामुळे गेल्या दोन महिन्यांत १२६२ हेक्टरवरील पिकाचे नुकसान झाले असून ४२३ कोटी ५१ लाख रुपयांची मागणी शासन दरबारी करण्यात आली आहे.

मृताच्या कुटुंबीयांना मदत देण्यात आली असली तरी अवकाळीमुळे फटका बसलेल्या फळबाग शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळालेली नाही.

# इरई नदीपात्राचे खोलीकरण

**लोकसत्ता वार्ताहर**

**चंद्रपूर :** इरई नदीतील सखल, उथळ भागामुळे तसेच गाळ साचून बेट तयार झाल्याने पुराचे पाणी शहरातील वस्त्यांमध्ये शिरते आणि पूरपरिस्थिती निर्माण होते. या पार्श्वभूमीवर जलसंधारण विभाग, जिल्हा प्रशासन व महापालिकेच्या वतीने नदीपात्र खोलीकरणाची मोहीम हाती घेण्यात आली आहे. खोलीकरणाच्या कामासाठी ११ पोकलॅन मशीन कार्यरत असून ९ किलोमीटर नदीपात्राचे खोलीकरण केले जात आहे.

इरई नदीच्या वरच्या भागात इरई धरण असून धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे नदीला पूर येतो. इरई नदीचे सखल पात्र, बेट व गाळ निर्माण झाल्याने पुराचे पाणी शहरातील रहमतनगर, नगिनाबाग परिसरात शिरते. यामुळे नदीपात्राचे खोलीकरण करण्यात यावे, यासाठी नागरिक, पर्यावरणप्रेमींनी प्रशासनाकडे मागणी केली होती. त्यानुसार पावसाळ्यापूर्वी इरई नदी खोलीकरण व स्वच्छतेचे काम सुरू करण्यात आले आहे.

# भंडाऱ्यात उष्माघाताचा पहिला बळी!

**भंडारा :** जिल्ह्यात उष्णतेची लाट असून तापमानाचा पारा प्रचंड वर पोहोचला आहे. उष्माघातामुळे लाखांदूर येथील एका ५२ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला असून पाच जणांवर उपचार सुरू आहेत.

भास्कर तरारे (रा. लाखांदूर) यांचा भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू असताना गुरुवारी मृत्यू झाला. रुग्णालयाचे अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अतुल टेंभुर्णे यांनी तरारे यांचा मृत्यू उष्माघातामुळे झाल्याचे सांगितले. नागरिकांनी उन्हापासून स्वतःचा बचाव करावा. शक्यतो उन्हात बाहेर पडणे टाळावे आणि शरीरातील तापमान नियंत्रित राहील या दृष्टीने उपाययोजना कराव्यात, असे आवाहन डॉ. टेंभुर्णे यांनी केले आहे. गुरुवारी भंडाऱ्याचे तापमान ४५ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले.

TATA

## टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत पत्ता : 11 वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - 400013**
**शाखा पत्ता : टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, एबीआयएल, पहिला मजला अवंती रेसिडेन्सी, अभिनव चौक, टिळक रोड, पुणे - 411030**

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना**
**(सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 9 (1) सह वाचलेल्या नियम 8(6) अंतर्गत)**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) आणि नियम 9(1) सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे सर्वसामान्य जनतेस आणि कर्जदार / सह-कर्जदार किंवा त्यांचे कायदेशीर वारस / प्रतिनिधी (कर्जदार) यांना सूचित करण्यात येते की **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. (टीसीएचएफएल)** यांचेकडे तारण असलेल्या खाली नमूद स्थावर मालमत्तेचा टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. (टीसीएचएफएल) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा घेतलेला असून त्यांची खाली नमूद कर्जदार व सह-कर्जदारांकडून घेणे असलेल्या थकबाकीच्या वसुलीसाठी दि. **19-06-2024** रोजी ''जशी आहे जेथे आहे'' व ''जशी आहे जे काही आहे'' व ''जे काही आहे तेथेच आहे'' आणि ''कोणत्याही आधाराशिवाय'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत व बयाणा रक्कम खाली नमूद करण्यात आलेली आहे. याद्वारे सूचित करण्यात येते की विक्री पुढे ढकलण्यात / खंडित करण्यात न आल्यास, सदर अनामत मत्ता / मालमत्तेची दि. **19-06-2024** रोजी दु. 2.00 वाजता ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल. ई-लिलावात सहभागासाठी बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट असलेला मोहरबंद लिफाफा **18-06-2024** रोजी सायंकाळी 5.00 वा. पर्यंत किंवा त्यापूर्वी टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या शाखा कार्यालयाच्या एबीआयएल, पहिला मजला अवंती रेसिडेन्सी, अभिनव चौक, टिळक रोड, पुणे - 411030 येथे सादर करण्यात यावा.

अनामत मत्ता / मालमत्तेची विक्री ''जशी आहे जेथे आहे'' अटीवर करण्यात येईल. थोडक्यात तपशील खाली येथे वर्णन केले आहेत.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जदार / सह-कर्जदार / कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधी / जामीनदार यांची नावे | मागणी सूचनेनुसार रक्कम | आरक्षित किंमत | बयाणा रक्कम | ताब्याचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) | 10373742 | **श्री. सागर दामोधर भालेराव सौ. शिल्पा सागर भालेराव** | **रु. 11,56,266/-** (रुपये अकरा लाख छप्पन हजार दोनशे सहासष्ट फक्त) ---------------- 20-05-2019 | **रु. 14,60,000/-** (रुपये चौदा लाख साठ हजार फक्त) | **रु. 1,46,000/-** (रुपये एक लाख शेहेचाळीस हजार फक्त) | **प्रत्यक्ष** |

**स्थावर मालमत्तेचे वर्णन :-**
सदर मालमत्ता नवीन एस. क्र. 88/2, 110/1ए, 110/1बी + 1+2+3+4, 110/2, 111/1+2 (जुना एस. क्र. 98/2, 120/1ए, 120/1बी1, 120/1बी2, 120/1बी3, 120/1बी4, 120/2, 121/1, 121/2) यापैकी प्लॉट क्रमांक 18+19, एकूण मोजमाप क्षेत्र 311.25 चौ. मीटर, महसूल गाव नवनागापूर, ता. जिल्हा. अहमदनगर येथे स्थित.
‘विघ्नहर्ता रेसिडेन्सी’ असे नाव आणि शैली असलेले अपार्टमेंट, सदर प्लॉट क्र. 18+19 वर बांधलेले, सोबत फ्लॅट क्रमांक 204, स्टिल्ट पहिल्या मजल्यावर या मालमत्तेसह आणि त्याचे कार्पेट क्षेत्र 22.03 चौ. मीटर, त्याचे बिल्टअप क्षेत्र 31.04 चौ. मीटर (जिना + बाल्कनी) आणि विक्रीयोग्य क्षेत्र 53.69 चौ. मीटर, **चतुःसीमा पुढील प्रमाणे :-** पूर्व - फ्लॅट क्र. 203; उत्तर - बाजूचा मार्जिन आणि 6 मी. रस्ता; दक्षिण - जिना आणि फ्लॅट क्रमांक 201; पश्चिम - बाजूचा मार्जिन आणि प्लॉट क्र. 12.

लिलावाच्या वेळी सर्व लोकांना सामान्यपणे व्यक्तीशः बोली सादर करण्याचे आवाहन करण्यात येते. याद्वारे कर्जदार / सह-कर्जदारांना एकूण थकबाकी रकमेचा पुढील व्याजासह सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून **15 दिवसांचे आत** भरणा करण्याची शेवटची संधी देण्यात येत असून तसे न केल्यास सदर अचल मालमत्तेची वेळापत्रकानुसार विक्री करण्यात येईल. प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे व्याज व शुल्कांसह वर नमूद करण्यात आलेली रक्कम (विक्रीच्या खर्चासह) सादर करण्यात आल्यास किंवा या प्रतिभूत कर्जाच्या रकमेचा व्याज व शुल्कासह भरणा करण्यात आल्याचा पुरावा त्यांना देण्यात आल्यास व त्यांची याबाबत खात्री झाल्यास विक्री थांबविण्यात येईल.
या विक्रीच्या संदर्भात कोणतेही कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यास किंवा अशा इतर कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेसाठी बोली देता किंवा काही हित साधता येणार नाही.
सदर विक्री ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 मध्ये विहित करण्यात आलेल्या तसेच पुढील अटींच्या अधीन राहून करण्यात येईल :

**सदर ई-लिलाव हा 19-06-2024 रोजी दु. 2.00 ते 3.00 वाजेपर्यंत http://bankauctions.in/ च्या माध्यमातून घेण्यात येईल व यात प्रत्येकी 10 मिनिटांचे मर्यादित कालविस्तार असतील.**

**अटी व शर्ती :** **1.** खाली परिशिष्टात देण्यात आलेला तपशील निम्नस्वाक्षरीकारांकडे उपलब्ध माहितीच्या आधारे देण्यात आलेला असून या घोषणेत चूक असल्यास, चुकीचे विधान करण्यात आल्यास किंवा काही गाळण्यात आल्यास त्यासाठी निम्नस्वाक्षरीकार जबाबदार असणार नाहीत. बोलीची रक्कम अथवा बोलीदारासंदर्भात काहीही वाद निर्माण झाल्यास तो लॉट सुरक्षित धनकोच्या संमतीने पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. **2.** सदर मालमत्तेची आरक्षित किमतीपेक्षा कमी रकमेस विक्री करण्यात येणार नाही. **3.** बोली वृद्धी रक्कम **रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)** असेल. **4.** सदर मालमत्तेच्या खरेदीसाठी प्रस्तुत करण्यात येणाऱ्या सर्व बोली डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपातील **''टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.''** यांचे नावे काढण्यात आलेल्या आणि शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर देय असलेल्या बयाणा रकमेसह सादर कराव्यात. अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम लिलावानंतर परत करण्यात येईल. बयाणा रकमेचा एनईएफटी / आरटीजीएस / आयएमपीएस द्वारे भरणा करण्यासाठी कृपया प्राधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. **5.** सर्वोच्च बोलीदार बोली देण्यास पात्र असल्यास आणि त्याने प्रस्तुत केलेली बोलीची रक्कम आरक्षित किमतीपेक्षा कमी नसल्यास त्यास लॉटचा खरेदीदार घोषित करण्यात येईल. सर्वोच्च बोलीदाराने प्रस्तुत केलेली बोली रक्कम अत्यंत कमी वाटत असल्यास ती बोली फेटाळण्याचा अधिकार ‘प्राधिकृत अधिकाऱ्यास’ असेल. **6.** नमूद केलेल्या कारणांसाठी विक्री बरखास्त करण्याचा / खंडित करण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यास असेल. **7.** आधीच वेळ घेऊन दि. **11-06-2024 रोजी स. 11 ते सायं. 5.00 वाजेपर्यंत** मालमत्तेची पाहणी करता येईल. **8.** यशस्वी बोलीदार घोषित करण्यात आलेल्या व्यक्तीस अशी घोषणा करण्यात आल्यानंतर लगेच बयाणा रक्कम धरून खरेदी किमतीच्या 25 टक्के रक्कम ‘प्राधिकृत अधिकाऱ्या’ कडे 24 तासांच्या जमा करावी लागेल आणि ही रक्कम जमा न केल्यास सदर मालमत्ता पुन्हा लिलावात / खाजगी तहाद्वारे पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. **9.** वर नमूद केल्याप्रमाणे सुरुवातीची रक्कम जमा करण्यात आल्यास खरेदी रकमेपैकी उर्वरित देय रक्कम खरेदीदारास मालमत्तेच्या विक्रीची निश्चिती होण्याच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत ‘प्राधिकृत अधिकाऱ्या’ कडे जमा करावी लागेल किंवा 15 व्या दिवशी रविवार किंवा सुटीचा दिवस येत असल्यास त्यापुढील दिवशी जमा करावी लागेल. **10.** वर नमूद कालावधीत भरणा न केल्यास विक्रीची पुन्हा घोषणा करण्यात आल्यानंतर सदर मालमत्तेची लिलाव / खाजगी तहाद्वारे पुनर्विक्री करण्यात येईल. तोवर भरलेली रक्कम टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड द्वारे जप्त करण्यात येईल अशी कसूर करणारया खरेदीदारास मालमत्तेवर किंवा पुढे त्या मालमत्तेची ज्या रकमेस विक्री करण्यात येईल तिच्या कोणत्याही भागावर कोणताही दावा सांगता येणार नाही. **11.** टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ला ज्ञात असलेले मालमत्तेवरील बोजे : वरील सारणीनुसार. मालमत्तेवरील दावे आणि तिचे स्वरूप व मूल्य यावर परिणाम करू शकणारा इतर तपशील : वरील सारणीनुसार. इच्छुक बोलीदारांनी मालमत्ता कर, वीज बिल इ. सह वैधानिक देणी इ. सारख्या मालमत्तेवरील बोज्यांच्या संदर्भात स्वतंत्रपणे चौकशी करावी. **12.** इतर कोणताही तपशील किंवा ई - लिलावाच्या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी संभाव्य बोलीदार आमचे सेवा पुरवठादार **मे. 4क्लोजर**, ब्लॉक नं. 605 ए, सहावा मजला, मैत्रीवनम कमर्शिअल कॉम्प्लेक्स, अमीरपेठ, हैदराबाद, 500038, त्याचे समन्वयक **श्री अरिजित कुमार दास, 8142000725, 8142000066, 8142000062 ईमेल :- arijit@bankauctions.in आणि ईमेल : info@bankauctions.in** किंवा मनीष बन्सल, ईमेल आयडी **Manish.Bansal@tatacapital.com** प्राधिकृत अधिकारी मो. क्र. 8588983696 यांचे मार्फत संपर्क साधू शकतात. कृपया तुमची शंका व्हॉट्सॲप क्र. 9999078669 वर पाठवा. **13.** सर्वोच्च घोषित करण्यात आलेल्या बोली रकमेवर सर्वोच्च बोलीदारास 1% दराने टीडीएस द्यावा लागेल. हा भरणा सर्वोच्च बोलीदारास मालक / कर्जदाराच्या पॅनमध्ये करावा लागेल आणि चलन ची प्रत आमच्या कंपनीकडे सादर करावी लागेल. **14.** वरील तपशीलासाठी सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर दिलेली **http://surl.li/twrwy** लिंक पाहावी. 15. तसेच **https://www.tatacapital.com/property-disposal.html** या लिंकवर देखील ही भेट द्यावी.

कृपया लक्षात घ्यावे - टीसीएचएफएल ने या मालमत्तेच्या विक्री / लिलावासाठी वर नमूद लिलाव भागीदाराशिवाय इतर कोणत्याही ब्रोकर / एजंटची नियुक्ती केलेली नाही. कृपया इच्छुकांनी या संदर्भातील कोणत्याही चौकशीसाठी केवळ निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**स्वा/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**

**ठिकाण : अहमदनगर**
**दिनांक : 31-05-2024**

TATA

**TATA STEEL LIMITED**

**Registered Offce:** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

## ३१ मार्च, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही / बारा महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

| तपशील | ३१.०३.२०२४ रोजी संपलेली तिमाही | ३१.१२.२०२३ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२३ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२४ रोजी संपलेले आर्थिक वर्ष | ३१.०३.२०२३ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ३६,६३४.७८ | ३४,६८१.९० | ३८,०४८.०७ | १,४०,९८७.४३ | १,४२,९१३.३२ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ६,०५७.९० | ६,०१२.७१ | ६,५४०.५४ | २२,८०७.८३ | २०,८७०.१७ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ५,४१६.१८ | ६,०२२.७६ | ५,८४१.५२ | ९,१७२.१५ | २०,०८९.७० |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ४,०५०.३० | ४,६५३.०४ | ४,१७२.४८ | ४,८०७.४० | १४,६८५.२५ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | ४,२२४.२४ | ४,८२०.९७ | ४,२२७.९२ | ५,४९८.७७ | १४,७७३.८३ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १ प्रति भाग) | १,२४८.६० | १,२२९.९८ | १,२२२.४० | १,२४८.६० | १,२२२.४० |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | १,३६,४४५.०५ | १,३५,३८६.४८ |
| सिक्युरिटीज प्रिमियम रिझर्व्ह | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ |
| नेट वर्थ | १,३५,२२२.२८ | १,३१,०२२.८६ | १,३४,१३७.४८ | १,३५,२२२.२८ | १,३४,१३७.४८ |
| भरणा झालेले कर्ज भांडवल | १२,८२३.१० | १०,१२६.५३ | १५,०५८.४९ | १२,८२३.१० | १५,०५८.४९ |
| निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो | ०.२८ | ०.२९ | ०.२८ | ०.२८ | ०.२८ |
| प्रत्येकी ₹ १ ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ३.२४ | ३.७३ | ३.३४ | ३.८५ | ११.७६ |
| प्रत्येकी ₹ १ ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ३.२४ | ३.७३ | ३.३४ | ३.८५ | ११.७६ |
| डिबेंचर विमोचन राखीव | १,३२८.७५ | १,३२८.७५ | २,०४६.०० | १,३२८.७५ | २,०४६.०० |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | ८.८३ | ४.३७ | ७.७९ | २.५१ | ३.८३ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | १४.०१ | ९.१२ | १०.४५ | १०.०१ | १०.७४ |

## ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या तिमाही / बारा महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

| तपशील | ३१.०३.२०२४ रोजी संपलेली तिमाही | ३१.१२.२०२३ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२३ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२४ रोजी संपलेले आर्थिक वर्ष | ३१.०३.२०२३ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ५८,६८७.३१ | ५५,३११.८८ | ६२,९६१.५४ | २,२९,१७०.७८ | २,४३,३५२.६९ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | २,४०३.३४ | २,२६२.०४ | ३,३०९.१८ | ६,६६७.०४ | १८,१२१.८६ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | १,८०८.८७ | १,९२७.९१ | ३,३२०.७७ | (१,१४७.०४) | १८,२३५.१२ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ५५४.५६ | ५२२.१४ | १,५६६.२४ | (४,९०९.६१) | ८,०७५.३५ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | २३२.१० | १,५६३.६० | १,३७०.९८ | (८,१३७.५१) | (५,७७३.७२) |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १ प्रति भाग) | १,२४७.४४ | १,२२८.८२ | १,२२१.२४ | १,२४७.४४ | १,२२१.२४ |
| राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रक व्याज | | | | ९१,१८५.३० | १,०३,९५३.९७ |
| नेट वर्थ | ८८,६२३.८२ | ८७,६८०.२८ | १,००,४६२.७९ | ८८,६२३.८२ | १,००,४६२.७९ |
| निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो | ०.७८ | ०.७८ | ०.६१ | ०.७८ | ०.६१ |
| प्रति समभाग प्राप्ती: | | | | | |
| प्रत्येकी ₹ १ ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ०.४९ | ०.४२ | १.४० | (३.६२) | ७.१७ |
| प्रत्येकी ₹ १ ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ०.४९ | ०.४२ | १.४० | (३.६२) | ७.१७ |
| डिबेंचर विमोचन राखीव | १,३२८.७५ | १,३२८.७५ | २,०४६.०० | १,३२८.७५ | २,०४६.०० |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | २.२१ | १.६२ | २.९९ | ०.६८ | २.७९ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | २.९१ | २.८८ | ४.०७ | २.४७ | ६.०१ |

**टीप :**
सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ आणि रेग्युलेशन ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३१ मार्च, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही / बारा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३१ मार्च, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही / बारा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

**टी व्ही नरेंद्रन**
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक
मुंबई: २९ मे, २०२४

**कौशिक चॅटर्जी**
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

TATA STEEL